अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा सरतपास
मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांव :– शितल रामदास गवस, वय :– ३४ वर्षे,

धंदा :– गृहिणी, राहणार :– पाटये, पुनर्वसन, सासोली, ता. दोडामार्ग.

**<u>सरतपास सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. व्ही. पेडणेकर यांचेकडून सुरु</u>** –

माझा भाऊ अक्षय म्हाडगुत याला ट्रान्स्पोर्ट करीता कर्ज हवे होते. समीक्षा ठाकुर ही फायनान्स कंपनीकडुन कर्ज देत असल्याबाबत समीक्षाने सांगितले होते. माझ्या भावाला दोन लाखाचे कर्ज हवे असल्याने मी तिच्याकडे १७,०००/– रुपये प्रोसेसींग फी म्हणुन भरले होते. समीक्षा ठाकुरने मला दिशा फायनान्स कंपनीकडुन कर्ज देते म्हणुन सांगितले होते. तसेच गरजु लोक असतील त्यांची नावे मला सांगण्यास सांगितली. दि.१६.०२.२०२३ रोजी ती पाटये पुनर्वसन येथे लक्ष्मी सावंत यांच्या घरी आली होती. तेथे आकांक्षा नाईक, लक्ष्मी सावंत व मी स्वतः हजर होते. तिने तेथे आम्हला कर्जासंदर्भात माहिती दिली व लागणारे कागदपत्रांबाबत सांगितले. त्याचवेळेस १,००,०००/– रुपये कर्जासाठी ७,५००/– रुपये प्रोसेसींग फी असल्याबाबत तिने सांगितले होते. तसेच महिलांनी कर्ज घेतल्यास रु.८,५००/– प्रोसेसींग फी असून कर्जामध्येच त्यातील रु.७,०००/– परत मिळतील असे तिने सांगितले. दि.२४.०२.२०२३ रोजी लोनसाठी लागणारी कागदपत्र व प्रोसेसींग फी घेण्याकरीता लक्ष्मी सावंत यांच्या घरी

ती आली होती. तिथे मी तिला माझे १७,०००/- रुपये व लक्ष्मी सावंतचे ३,०००/- रुपये असे एकुण २०,०००/- रुपये जी.पे केले होते व त्याबाबत समीक्षा ठाकुरने मला सही करुन स्लीप दिली होती. त्यावेळेस लक्ष्मी सावंत व आकांक्षा नाईक यांनी देखील पैसे भरले होते. मला दिलेली स्लीप १७,०००/- रुपयांची होती. त्यानंतर १५ दिवसात कर्ज मिळेल असे तिने आम्हाला सांगितले होते. आम्ही तिला प्रोसेसींग फी भरल्यानंतर विचारणा केली असता सदरची प्रोसेसींग फी तिने यश सर यांच्या खाती वळती केल्याबाबत तिने सांगितले होते. त्यानंतर आम्ही पुन्हा कर्जाबाबत तिच्याकडे चौकशी केली असता तिने कर्ज होण्याबाबत ग्वाही दिली व पुढे अनेकदा कर्ज मिळेल असे सांगितले. आम्हाला संशय आल्याने आम्ही तिला पुन्हा विचारले असता तिने आम्हाला सांगितले की, आमच्या अगोदर ज्या लोकांनी कर्ज मागितले आहे, त्यांना अगोदर मिळेल व त्यानंतर आम्हाला मिळेल. पुन्हा थोडया दिवसांनी आम्ही तिच्याकडे कर्जाची चौकशी केली असता तिने आम्हाला आमचे चेकबुक नसल्याचे सांगितले. आम्ही चेकबुक तिच्याकडे दिले असता देखील तिने आम्हाला वेळोवेळी कर्ज होणार थोडे दिवस थांबा असे सांगितले. त्यानंतर दि.१७.०४.२०२३ रोजी तिने आम्हाला कर्जाची रक्कम घेण्याकरीता सावंतवाडी तळयाजवळ बोलविले तसेच दि.२४.०३.२०२३ रोजी आम्हाला गोवा, मेरीएट हॉटेल जवळ बोलविले होते. परंतु, तिच्यावर आम्हाला विश्वास नसल्याने आम्ही तेथे गेलो नाही. त्यानंतर आमच्या लक्षात आले की, समीक्षा ठाकुर ही आमची फसवणुक करत आहे. म्हणुन दि.२२.०५.२०२४ रोजी

आम्ही तक्रार दाखल केली. समीक्षा ठाकुर हिला पाहिल्यास मी ओळखु शकते. ती आज रोजी न्यायालयात हजर आहे. मला १७,०००/– रुपयाची दिलेली पावती पाहिल्यास मी ओळखु शकते. आता मला सदरची पावती दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर समीक्षा ठाकुरची सही आहे. (सदरचा दस्तऐवज साक्षीदाराने न्यायालयात ओळखला असल्याने व ती स्लीप तिला आरोपीने पारीत केली असल्याची तिची साक्ष असल्याने त्यास निशाणी देण्यात येत आहे.) सबब, त्यास **निशाणी क्र.** P–4/PW3 देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस्. ए. गवस यांचेकडून सुरु –**

२) या संपुर्ण घटनेच्या अनुषंगाने मला पोलीस स्टेशनला जाण्याचा योग आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला स्वतःला कर्ज हवे आहे या करीता मी समीक्षा ठाकुरकडे गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला कर्ज हवे आहे या कारणास्तव मी समीक्षाकडे कर्ज मागणी करण्याकरीता गेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, आम्हाला दोघांनाही कर्ज हवे होते, असे नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, माझा भाऊ स्वतः वैयक्तीक कर्जासंदर्भात समीक्षाला भेटला असे काही घडले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मला वैयक्तीक कर्ज घेण्याकरीता माझ्या भावाने मला पैसे दिले होते. साक्षीदार सांगते की, भावाला पण कर्ज हवे होते. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्यात व समीक्षा ठाकुर मध्ये कर्जासंदर्भात करार झाला

असे काही घडले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, समीक्षा ठाकुरने स्वतः आपण तुम्हाला कर्ज देतो असे सांगितले नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, अर्थ ग्रप च्या माध्यमातुन दिशा फायनान्स या कंपनी संदर्भात मी स्वतः किंवा माझ्या भावाने चौकशी करुन माहिती मिळवली असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी फसवणुक झाल्याबाबतची मी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन फिर्याद दाखल केली, असे काही घडले नव्हते. फिर्याद दाखल केल्यावर फिर्यादीच्या खाली तक्रारदाराची सही असते, याची मला माहिती आहे. मी दिलेल्या फिर्यादीवर मी सही केली होती. २२ मे रोजी मी फिर्याद दाखल केली होती. मी फिर्याद देण्याकरीता किती वाजता गेले होते ती वेळ मला माहित नाही. साक्षीदार सांगते की, मी संध्याकाळी गेले होते. त्या दिवशी मी पोलीस स्टेशनमध्ये एकंदरीत दोन सह्या केल्या होत्या. हे म्हणणे बरोबर आहे की, पोलीसांनी माझा जबाब नोंदवुन घेतला व त्यावर मी सही केली नाही, असे घडले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी दिलेल्या तक्रारीचे पुढे काय झाले, ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, २२ मे ही तारीख सोडुन त्याच्या अगोदर किंवा नंतर मी पोलीस स्टेशनमध्ये पुन्हा गेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्याचप्रमाणे पोलीस माझ्या घरी आले व माझे टिपण नोंदविले असे काही घडले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मला समीक्षाकडुन रक्कम रु. २०,०००/– ची पावती मिळाली असे काही घडले नव्हते. आता मला निशाणी क्र.P–4/PW3 वरील पावती दाखविण्यात आली. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या पावतीवर समीक्षा ठाकुर हिचे नाव नमुद

नाही, तसेच तिच्या नावाचा शिक्का देखील नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, या पावतीवरील सही समीक्षा ठाकुरची असल्याचे दर्शविणारा माझ्या शब्दांव्यतिरीक्त इतर कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, ही पावती माझ्या समक्ष समीक्षा ठाकुरने दिलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, या पावती वरील सही माझ्या समक्ष समीक्षा ठाकुरने केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, या पावतीवरील सही कोणाची आहे व ती कधी केली आहे हे मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगते की, आमच्या समोरच सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जीपेच्या माध्यमातुन समीक्षा ठाकुरला रक्कम दिल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.P–4/PW3 वरील स्लीपचा व आरोपी समीक्षा ठाकुरचा कोणताही संबंध नसुन ही स्लीप आरोपीने मला कधीही दिलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपी समीक्षा ठाकुरचा दिशा ग्रुपशी कोणताही संबंध दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या भावाने त्याची समीक्षा ठाकुरकडुन फसवणुक झाल्याबाबत त्याने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार दाखल केली किंवा कुठलेही टिपण नोंदविले असे काही घडले नव्हते.

३) हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला कर्ज हवे असल्याने मी लक्ष्मी सावंत यांच्या घरी समीक्षा ठाकुर हिला भेटले असता तिने आम्हाला कर्जाची माहिती दिली व त्यानंतर प्रोसेसींग फी करीता मी जीपेद्वारे रक्कम भरली व तिने मला

स्लीप दिली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही समीक्षाकडे वारंवार चौकशी केली असता पुर्वीच्याच लोकांचे अजुन कर्ज दिले गेलेले नाही असे तिने आम्हाला सांगितले तसेच त्यानंतर तिने आमच्याकडे चेकबुकची मागणी केल्याने आम्ही तिला चेकबुक देऊन देखील तिने आम्हाला कोणतेही कर्ज दिले नाही, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, समीक्षा ठाकुरने मला पावती दिली असुन त्यावर समीक्षा ठाकुर हिची सही आहे, हे मी खोटे सांगत आहे.

४) हे म्हणणे बरोबर आहे की, समीक्षा ठाकुर ही शेतकरी घराण्यातील असुन तिचे आई वडील शेती करतात. हे मला माहित नाही की, त्यांचा नर्सरीचा व्यवसाय आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांच्या नर्सरीतुन झाडे घेऊन गेले होते व त्या झाडांचे मी कधीही पैसे दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी माझ्याकडे वारंवार पैशाची मागणी केल्याने व आता पैसे द्यावे लागणार याचा अंदाज घेऊन मी तिच्या विरुद्ध खोटया पावत्या दाखल केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-

ठिकाणः- दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)
दिनांकः- २७/०१/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग-१, दोडामार्ग.